**<u>रे.दि.मु.क्र. ६३४/२०२५ मधील निशाणी २० वरील आदेश</u>**
(CNR NO.MHST-070055602025)

शंकर भिमराव जंबुरे (मुसळे) व इतर --- वादी
वि.
दत्तात्रय राणू पवार व इतर --- प्रतिवादी

सदरहू अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये नि.क्र. ५ च्या अंतरीम अर्जात दुरूस्ती करण्याकरीता दाखल केला आहे. सदर अर्जास पुरक शपथपत्र देण्यात आलेले आहे. सदर अर्जास पुरक शपथपत्र देण्यात आलेले आहे.

२. वादीचे कथन असे की, सदर दावा वादीने तुर्तातुर्त ताकीद मिळण्याकरीता दाखल केला आहे. नि.५ च्या तुर्तातुर्त ताकीद अर्जामध्ये काही ठिकाणी टायपिंग मिस्टेक झाली आहे. करीता, अर्जात नमूद केलेली दुरूस्ती करणे गरजेचे आहे. सदरील दुरूस्ती आवश्यक असून सदर अर्जात कोणताही बदल होत नाही. तसेच, सदरील प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होत नाही. सबब, वादीने प्रस्तुत दुरूस्तीचा अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे. प्रतिवादींचे वकीलांनी कथन केले की, प्रस्तुत अर्जातील कथने खोटी व बनावट असून त्यांनो मान्य व कबूल नाही. करीता, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

३. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रस्तुत अर्जातील दुरूस्ती ही तांत्रीक स्वरूपाची असल्याचे दिसून येते. त्या अनुषंगाने वादी कोणत्याही नवीन अनुतोषाची मागणी करीत नाही. सदरची दुरूस्तीची मागणी ही अंतरीम अर्जाच्या गुणावगुणावर निकाल देण्यासाठी महत्वाची आहे. त्यामुळे सदर अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सदर दुरूस्तीने अर्जाच्या मूळ स्वरूपात कोणताच

बदल होत नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ प्रमाणे न्याय सुनिश्चीत करण्यासाठी अमर्याद अधिकारांचा उपयोग करता येईल. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालील आदेश.

**<u>– : आ दे श :–</u>**

१. वादीचा अर्ज (नि.२०) मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावित दुरूस्ती १४ दिवसांच्या आत करून घ्यावी व सोबत दुरूस्ती प्रत अभिलेखावर दाखल करावी.

Digitally signed by ASHA VISHAL MOHITE
Date: 2026.07.08 17:46:23 +0530

कराड. (श्रीमती ए.व्ही.मोहिते )
दि. ०८/०७/२०२६. २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कराड.
ता.कराड, जि.सातारा.